कोलंबीया रेकॉर्डस्

न्यु प्रोसस



હિંદુસ્તાની
ગુજરાતી
મરાઠી
ઉર્દુ

Columbia's
STAR
ARTISTE

Columbia Records
MAGIC NOTES
TRADE-MARK

19TH- ISSUE

કોલંબીયા-ન્યુ પ્રોસેસ રેકોર્ડસ.

Sole distributors for Western India

S. ROSE & Co. Ltd. RAMPART ROW, FORT, BOMBAY.

19-12-34

Columbia
New Process
Records

10″ Double Sided Pale Green Lable Records

कोलंबीया न्यु प्रोसेस् रेकॉर्डस्.


१०" इंची गायनवाली पेइंल ग्रीन लेबल रेकॉर्डस.

GE Series दरेकची किं. रु. २-१२ Price **Rs. 2-12** each.
VE ,, ,, किं. रु. ३—८ ,, **Rs. 3—8** each.

MARATHI RECORDS मराठी रेकॉर्डस्

Miss Gohar (Bijapur) **मिस गोहरबाई** (बिजापूर)

भक्तिरसानें ओथंबलेलीं हीं भजनें, असामान्य कंठमाधुर्य लाभलेली



मिस् गोहर कर्नाटकी सारखी गायन-कोकिळा व आमच्या अगदीं आधुनिक व सुधारलेल्या अशा नव्या पद्धतीच्या रेकॉर्डिंग मशीनवर त्यांचें झालेलें रेकॉर्डिंग या तीन्ही गोष्टींचा मिलाफ इतका हृदयंगम वठला आहे कीं, त्याबद्दल खरोखरच आम्हांला अत्यंत अभिमान वाटतो. अनेक बोलपटां-मध्यें काम करून मिस् गोहर कर्नाटकी यांनीं आपल्या मधुर संगीताबद्दल मिळवलेली कीर्ति या आपल्या भावना-पूर्ण भजनाच्या रेकॉर्डस्नीं अधिकच

वाढीस लावली आहे. या रेकॉर्ड्स्मध्यें त्यांनीं भक्तिरसाचें इतक्या सुंदर रितीनें आविष्करण केलें आहे कीं, त्या ऐकल्यावर कोणाच्याही चित्त-वृत्ती पाझरल्याशिवाय राहाणार नाहींत. त्यांतूनही अत्यंत आधुनिक शोधानीं परिपूर्णतेस पोंचलेल्या नव्या मशीनवर झालेल्या या त्यांच्या रेकॉर्ड्स्मध्यें एकप्रकारची अपूर्व गोडी निर्माण झाली आहे.



(मिस गौहर रेकॉर्डींग चालत असतांना.)

VE 1001 { पतित पावन म्हणविसी (भजन)
,, १००१ { अगा वैकुंठींच्या राया (भजन भैरवी)

एकबाजु—पतित पावन। म्हणविसी आधीं। मग कां उपाधी भक्तां मागें ॥
तुझें म्हणवितां दुजें अंगसंग। उणेपणा सांग कोणाकडे ॥ २ ॥

सिंहाचें मातुकें जंबुक पै नेतां। थोरांचिया माथां लाजवाटे ॥ ३ ॥
म्हणे कान्हो पात्रा देह समर्पणें । करावा जतन ब्रीदासाठीं ॥ ४ ॥


दुसरी बाजूः—

अगा वैकुंठीच्या राया । जगा विठ्ठल सखया ॥
अगा नारायणा । अगा वसुदेव नंदना ॥ धृ० ॥
अगा पुंडलीक वरदा । अगा विष्णु तूं गोविंदा ॥
अगा रखुमाईच्या कांता । कान्होपात्रा राखि आतां ॥ १ ॥

गेल्या महिन्यांत बाहेर पडलेले रेकॉर्डस

G.E. 1571 / जी. ई. १५७१	करुणाकर माधवा	(कर्नाटकी काफी)
	भुवन भाग्येश्री रामा	(कर्नाटकी)
G.E. 1601 / जी. ई. १६०१	झणीं दावी पाया.	(पहाडी)
	मोहन शाम शोभना	(भीम पलास)
G.E 1628 / जी. ई. १६२८	अबघाची संसार	(अंभग)
	सतत विमल भजनामा	(भजन)
G.E. 1678 / जी. ई. १६७८	तुम बीन मेरी कोन खबरले	(भजन)
	जगके हय साधु	(भजन)
G E. 1696 / जी. ई. १६९६	आपको चहानेवालोंकी	(गझल)
	हुर मैं मस्तीं कहां	(,,)
C.E. 1726 / जी. ई. १७२६	प्रभु तेरी दासी हु मैं	(भैरवी)
	बगोकुल छोड चले प्रभु	(जिल्हा)
G. E. 1739 / जी. ई. १७३९	फझल करम कर	(भैरवी)
	यारब सांई	(बागेश्री)

Maharashtra Kavi Kokil. महाराष्ट्र कवि कोकिळ.
Sjt. Sopandeo Chowdhary श्री. सोपानदेव चौधरी



कवीचें हृदय व गायकाचा मधुर कंठ, या गोष्टी एकत्र सांपडणें विरळाच ! पण त्या एकत्र आल्या कीं कोणाही व्यक्तीच्या मनावर वशीकरण विद्येप्रमाणें मोहिनी पाडणारी एक प्रबळ शक्ती निर्माण झालीच म्हणून समजावें ! ही शक्ति लाभलेलीं भाग्यवान् माणसें फारच थोडीं. पण त्या शक्तीला योग घाट देऊन व उत्साहपूर्वक निरलसतेनें व समयज्ञतेनें तिचा जनरंजनासाठीं कसा उपयोग करायचा, हें ज्यांना कळतें अशा व्यक्ति त्यांहूनही थोडया सांपडायच्या! या अशा अत्यंत थोडया भाग्यवान् गायक कवींमध्यें महाराष्ट्राचे नवोदीत कवि सोपानदेव चौधरी यांची प्रामुख्यानें गणना होते. महाराष्ट्रकविसंमेलनामध्यें त्यांस काव्यगायनाबद्दल पारितोषक मिळाले, असून बडोद्याचे राजकवि चंद्रशेखर यांनीं त्यांस महाराष्ट्रकाव्यकोकिळ या पदवीनें गौरवलें होतें. अनेक जाहिर काव्यगायनाच्या बैठकांमध्यें ते सुशिक्षित श्रोतृवर्गाला आनंदानें डोलावयाला लावतात. प्रभातसारख्या प्रमुख फिल्मकंपनीकडून रुपेरी पडद्यावरून रसिकांना आनंदाची मनमुराद खिरात करण्यासाठीं या कवीचा व त्याच्या ‘ गौकुळींचा कान्हा ’ सारख्या मधुर गीतांचा उपयोग करून घ्यावासा वाटला, याहून जास्ती शिफारसपत्रांची त्यांच्या या भरदार व सुरेल आवाजांतून निघालेल्या रेकार्डसूना जरुरी आहे असें आम्हांस वाटत नाहीं.

GE 1755 / १७५५	मोहिनीस	(काव्य गीत)
	ईषारा	(„)

एक बाजुः—

तूं अशीच निशिदिनीं टाकी गडे मोहनी मजवरी टाकी गडे मोहनी ॥ ध्रु० ॥

मेघांच्या बाहू पाशांतुनि जशी दामिनी जाई निसटुनि

दृष्ट कुणाची लागे म्हणुनी गेली कशी छेडुनी, चकाकत गेली कशी छेडुनी ॥

नको तुझी ती अखंड सोबत अशीच मजला जाई छेडीत

यांतच भरली सारी गंमत अशा सुखाचा धनी होईन मी अशा सुखाचा धनी ॥

प्रीतीचा मग रोग कशाचा ? योग नसे हट योग कशाचा ?

शुभ मरणाचा लाभ कशाचा ? आशा धरावी कुणी ? भलतीच आशा धरावी कुणी ! ॥

प्रेम आंधळें जणुं भिकारी, तशीच घेई सारंगी करिं

भिक्षा मागत तुझीया दारीं खुल्या दिलाची वना ? आळवुनी खुल्या दिलाचीच नां ॥

देउनिया मज अपुरें दर्शन, चित्त घेतलें सगळें चोरून

कधीं फेडिशिल प्रेमाचें रिण ठेवी गडे त्वन्मनी, स्मृती ही ठेवी गडे त्वन्मनी ॥

दुसरी बाजुः—

झोंक तोल तोल ग, आडाचं पाणि लई खोल ॥ ध्रु० ॥

आईला आनंद द्यावया मनापासुनी करिसी सेवा

विसरूनी जाशी आपुल्या जीवा

कष्ट तुझे बिनमोल ग, आडाचं पाणी लई खोल ॥ १ ॥

रहाट कप्पी नसतीं साधनें, पाणी काढिशी दो हातानें

कोठवरी तूं अशा रितीनें

जीव दमविशी बाले ग, आडाचं पाणी लई खोल ॥ २ ॥

ओढुनिया पोहरा भराभरा कडेवरी आडाच्या भयंकर

आधार नसे कसला लवभर

जाईल मध्येंच झोल ग, आडाचं पाणी लई खोल ॥ ३ ॥

भय सूचक हा ध्वनी कशाचा, ऐक गडे पडसाद तयाचा

यमराजाच्या दरबारींचा

वाजतसे ढोल ग, आडाचं पाणी लई खोल ॥ ४ ॥

क्षण भंगुर हें जीवित बाई निघावयासी करिते घाई
चंचलतेला सीमा नाहीं
उडेल बघ चंडोल ग, आडाचं पाणी लई खोल ॥ ५ ॥
महंत साधु गेले सांगुनि, बोल तयांचे मनांत आणी
बोलत नाहीं वेड्या बाणी
उगाच आपुला फोल ग,आडाचं पाणी लई खोल ॥ ६ ॥

Mr. Devaskar & Party. देवासकर ॲन्ड पार्टी

आधुनिक मराठी कवितेसंबंधीं अलीकडे निर्माण झालेल्या लोकप्रियतेचें एक



उपयुक्त फळ म्हणजे भावगीत गायनाची वाढत चाललेली प्रथा हें होय. किंवा उलट असेंही म्हणतां येईल कीं, या भावगीत गायनाच्या प्रथेमुळेंच आधुनिक मराठी काव्याकडे, आजवर त्याची अवहेलना करीत आलेल्या वर्गांचेंही लक्ष्य वेधून घेतलें जात आहे. महाराष्ट्रांतील विशेष पुढारलेल्या शहरांमधून तर सुशिक्षित समाजामध्यें या भावगीत गायनासंबंधींची मार्मिक अभिरुचि व रसग्रहण यांस मानाचें स्थान प्राप्त होऊं लागलें आहे. तशा परिस्थितींत मि. देवास्करांसारख्या भावमधुर गायनांत प्राविण्य मिळविलेल्या गायकाचें जनतेकडून सार्वत्रिक कौतुक व्हावें यांत नवल नाहीं ते आपल्या या गुणामुळें इतक्या अल्पावधींत लोकप्रिय झाले आहेत कीं; त्यांचें नांव माहित नसलेले संगीत रसिक क्वचितच असतील. विशेषत: आपल्या या गायनाध्यें मदतीसाठीं त्यांनीं आपली पार्टी तयार केली अस-

त्यामुळं त्यांच्या आकर्षकतेमध्यें अधिकच भर पडली आहे. ज्यांनीं त्यांचीं गीतें एकदां एकलीं आहेत त्यांच्या मनाची ती कायमचीच पकड घेतील.

GE 1756 } रानगीत (अनंत काणेकरकृत) (काव्यगीत)
१७५६ } गवलण ,,

एक बाजू:—

चल ग सजणे राना मधें । चाफ्याचं फूल तुझयां काना मधें ।
उठे चंद्रमा झाडितुनी । बावरशी कां तूं सजणें ।
रानवटीं हिरवी झाडी । डोंगरमाथीं ही उघडीं ।
चल फिरूं घालुनि गळां गळे । रामागयाँचे फूलव मळे ।

कोण ग बाई चावट हा ।
पानांच्या जाळित पहा ॥

चन्द्र ग बघतो जळातुनी । बावरशी कां तूं सजणी ।
ओसाडी बघ पुष्करिणी । बसली कशी जळ झाकलुनीं ।
दोघांचे मुखबिंब गडे । जाउनिया पाहु तिकडे ।

कोण ग बाई चावट हा ।
पांढुरका पाण्यांत हा ।

डुले कवडसा जळांतुनि । बावरशी का तु सजणी ।
पदर आडवा बांध झणी । कर गुंफू कमरे मधुनि ।

हूं हूं करुनियां चावट हा ।
कानोसा कुणी घेत पहा ।

वायु ग फिरतो तृणांतुनी । बावरशी का तुं सजणी ।
बावरुनि गेलीस बाई । चाफा मुळीं फुलतच नाहीं ।

चल तर सजणे जाऊं घरीं ।
नका साजणा राहु तरी ॥

दुसरी बाजु:—

कस वेड, लाविल कान गोवळिया ।
तुझी रे संगती नाहि कामाची, मी सुंदरा कोळ्या मनाची ।
मज दृष्टी झाली या साची, मग तुझी घेईन चर्या ।। १ ।।
माझारे वंश आहे मोत्याचा । तुं तर यातींहीन गवळ्याचा ।
ऐक्य झालिया नावा रूपाच । ठावाचि पुससीया ।। २ ।।
तुझी रे अंगाचि धुरट घाणी । तनु काय दिसते ओंगळवाणी ।
मुर्ली वाजविशी मंजुळवाणी । मनमोहन कान्हया ।। ३ ।।

Shahir Shidhram Muchate, (Dhulia.) शाहीर सिद्राम मुचाटे, (धुलीया)

शाहीर मुचाटे यांनीं आपल्या ईश्वरदत्त कंठमाधुर्याच्या व काव्य-प्रतिभेच्या गुणांचा महाराष्ट्राचें खरें राष्ट्रीयकाव्य जें लावण्या व पोवाडे तें टिकवून ठेवण्याकडे व लोकप्रिय करण्याकडे उपयोग करण्याचा जो प्रयत्न चालवलेला आहे. त्याची गायन प्रेमी लोकांकडूनच नव्हे तर श्रेष्ठ साहित्याचार्यांकडूनही चहा होऊं लागली आहे. कारण हें कार्य खरो-



खरच अत्यंत कठीण आहे. शाहिरी वाङ्मयाचा अभ्यास व त्या धर्तीवर काव्यरचना करणें या गोष्टी आधुनिक काव्यपरिशीलन व आधुनिक काव्य-लेखनाइतक्या एका ठरीव धोपट मार्गानें साधण्यासारख्या नाहींत. ग्रामीय जीवनांतील अकृत्रिम काव्य व सौंदर्य यांचा आस्वाद घेण्यास लाग-णारी जी एकप्रकारची विबक्षित मनाची ठेवण ती ज्याला लाभली

असेल त्यालाच हें साधूं शकतें. हा असा दुर्मिळ गुण शाहीर मुचाटे यांच्यामध्यें असल्यामुळेंच जुन्या पोवाडे, लावण्यांच्या धर्तीवर त्यांनीं लिहिलेलें हें शाहिरीकाव्य व त्याचें गायन हें अत्यंत परिणामकारक होऊं शकतें. पति युद्धावर निघाल्यावर त्याच्या पत्नीच्या अंत:करणाची उडालेली खळबळ त्यांनीं आपल्या 'वीरांगनेची हुरहुर' या आपल्या लावणींत अत्यंत कौशल्यानें चित्रित केली असून सासरीं येऊन बरेच दिवस झालेल्या नवबधूचें हृद्गत रसिकांची वृत्ति हेलावून सोडणाऱ्या रीतीनें 'सासुरवासिणीच्या सांगाव्यांत' व्यक्त केलें आहे.

GE 1757 ⎱ **वीरांगनेची हुरहूर** (लावणी)
१७५७ ⎰ **सासुर वासिणीचा सांगावा** (लावणी)

एक बाजू:—

मावशे ग। काकाला सांग मला माहेरीं ने ॥ धृ ॥
साळीच तांदूळ कांडवे ना। आवलाची मला भांडवेना ॥
सवतीसंगं बाई भांडवेना। बरं नाहीं ग। झालं कांहीं ग।
फुटलं वाईग। नशीब हें ॥ मावशे ग ॥ १ ॥
डोंगराची मोळी आणवेना। विहिरीचं पाणी भरवेना ॥
खेड्याच्या वस्तीत करमेना। गत अशी ग। करूं कशी ग।
दु:ख मशीं ग। साहवे ना हें। मावशे ग ॥ २ ॥
हात जोडून मी पडते ग पाय। कसंहि करून मला घेऊन जाय ॥
दाव माझं गांव मला, करमेना बाय। नाहीं तरी ग।
जीव देईन। कुठं जाऊन लक्षांत घे ॥ मावशे ग ॥ ३ ॥


दुसरी बाजू:—

पति गेले युद्धावरी ग। जीवाला हूरहुरी ॥ धृ ॥
महिने झाले पंधरा सोळा। मशीं लागेना डोळा।

काय झालं जाणे हरी ग । जिवाला हूरहुरी ॥ १ ॥
जासूदही येईना कोणी । पत्र घेऊन झणीं
वाट पाहून शिणलें भारी ग । जिवाला हूरहुरी ॥ २ ॥
नवस मी करते त्याला । जेजुरीच्या खंडोबाला ॥
नाथ येऊंदे सुखानं घरीं रे । जिवाला हूरहुरी ॥ ३ ॥
राजा शिवाजी आमचा । वाली गोरगरिबांचा ।
देवा त्याचा विजय करीरे । जिवाला हूरहुरी ॥ ४ ॥
धन्य धन्य त्या नारी । प्रित ऐशी पतिवरी
सिद्रामाची शाहिरी ग । जिवाला हूरहुरी ॥ ५ ॥

Master Lahanoo Nagpure. मास्तर लहानु नागपुरें

बोलपटांच्या उदयाबरोबरच ज्या कित्येक गायकांचा अल्पावधींत



उदय होऊन त्यांस कमालीची लोकप्रियता लाभली त्यांत लहानू मास्तर यांची प्रामुख्यानें गणना केली पाहिजे. देवकी चित्रपटांतील त्यांच्या पदांनीं तर लोकांना जणूं वेडच लावलें म्हणायाला हरकत नाहीं. त्यांचीं तीं त्यावेळचीं पदें अजून घरोघर गायन प्रेमी लोकांच्या तोंडीं बसलीं आहेत. गायकांच्या गायन कलेची खरी कसोटी ही कीं, त्यानें गायलेलें पद कितीदांही ऐकलें तरी पुनः पुन्हां ऐकावेसें वाटावें व या कसोटीस लहानू मास्तर

यांचीं वर उल्लेखलेलीं दोन पदें पूर्णपणें उतरतात असेंच कोणाही रसिकाचे मत पडेल. आधींच हीं पदें लहानू मास्तर यांच्या सुरेल कंठांतून निघालेलीं व त्याच्या जोडीला त्यांतील उत्कृष्ट भक्तिरसाचा ओलावा, यांमुळें त्यांस विशेषच गोडी आलेली आहे. उत्कृष्ट गायक आपल्या गायनाच्या द्वारें भक्तिरसाचें अविष्करण किती अप्रतिमरीतीनें करूं शकतो, त्याचीं हीं दोन पदें म्हणजे उत्तम नमुनेच आहे, असें म्हणावयाला हरकत नाहीं.


GE 1758 / १७५८	**प्रभु निजला कसा आज**	(काफी)
	प्रभु आठवा कोदंडधारी	(कर्नाटकी आनंद भैरवी)

एक बाजू:—

प्रभु निजला कसा आज । निशा सरेना अजुनी वसुधा भारी झाली ॥
असुर गांजिती जगता । अगतीक होती जनता ॥
अबलाना न च त्राता । त्वरीत जाग देवा ॥

दुसरी बाजू:—

प्रभु आठवा कोदंडधारी आसरा तुम्हां कारागारीं
अंबूधि जसा वरी शांतता । उदरी तप्त धरुनी वडवानला ॥
खल कृती दे तापा शांत ठेवी चित्ता प्रार्थना प्रभूला देवो धैर्या ॥१॥



HINDUSTANI RECORDS हिन्दुस्तानी रेकार्डस्

Sagitacharya Ramkrishna Vaze Boa

संगिताचार्य रामकृष्ण वझे बुवा.

संगीताचार्य ही पदवी ज्यांना खऱ्याखुऱ्या अर्थानें लावतां येईल, असे जे श्रेष्ठ गायक केवळ हाताच्या बोटांवर मोजण्याइतके आज हिंदुस्थांत आढळून येतील त्यांत वझेबुवांस बऱ्याच वरचें स्थान देणें वाजवी आहे. भारतीयसंगीतकलेचें खरें वैभव जर कोणाला आज पाहावयाचें असेंल तर त्यानें वझेबुवांचेंच गायन ऐकणें जरूर आहे. गायनप्रेमी लोकांचे अत्यंत आवडते रंगभूमीवरील गायक नटही आज वझेबुवांपुढें नम्रपणें आपलीं मस्तकें नमवीत आहेत व त्यांचे शिष्य म्हणवून घेण्यांत भूषण माणीत आहेत! त्यांच्या यापूर्वींच बाहेर पडलेल्या रेकॉर्डसनीं लोकांना कशी मोहिनी पाडली याचें वर्णन करण्याची जरूरी नाहीं. त्यांच्या नवीन रेकॉर्ड्स आम्ही घेत आहोंत ही बातमी कळतांच शेंकडों गायनाभ्यासी व गायनाचार्यांच्या अप्रतिम चीजांच्या रेकॉर्डस् घेऊन गायनकलेची जी आम्हीं सेवा करीत आहोंत त्याबद्दल आभार प्रदर्शन करणारीं अनेक पत्रें आमच्याकडे आलीं एवढेंच लिहिलें म्हणजे वझेबुवांच्या लोकमान्यतेची कुणालाही कल्पना येईल.



GE 1759 १७५९	हर हर शंकर	(भटीयार)
	जोबन रस ले गई	(गारा बागेश्री)

संगीताचार्य वझे बुवांचीं गेल्या महिन्यांत बाहेर पडलेलीं रेकॉर्डस

GE 1501	बोलरे पपैयर	(मीयां मल्हार)
,, १५०१	तीरथ को सब करे	(तीलक कामोद)
GE 1517	डार डार बातनपर	(भैरव बहार)
,, १५१७	हरदम मौला तेरो नाम	(जीवनपुरी)
GE 1532	डमरु डम डम बाजे	(नटबिहाग)
,, १५३२	तराना	(मारवार)
GE 1540	उद्धव करमनकी गत न्यारी	(भजन)
,, १५४०	बोल राधा अब तुं	(बरवा)
GE 1554	सखी मुख चंद्र छबी	(खंभायती)
,, १५५४	मेरे घर आवत	(तीलंग ठुमरी)

Miss Manoramadevi — मिस मनोरमादेवी.

बनारसी ढंग ही काय चीज आहे हें ज्यांस समजावून घ्यायचें असेल किंवा ज्यांना तें समजत असेल, त्यांस त्याची खरीखुरी गोडी चाखायची असेल त्यांस मनोरमादेवीच्या या रेकॉर्डस पेक्षां दुसरें अधिक चांगलें साधन क्वचितच.आढळून येईल.

GE 1760	जोगीया कें संगवा	(चैती)
१७६०	झुलनीयावाली	(कजरी)

एक बाजु—

जोगीया के सगवा रे होई बै जोगनीयां हो रामा
और बन बनकी लकडी भटोई बैं धुनीयां रमैं बैं हो रामा

दुसरी बाजु—

झुलनीया वालीरे दैयां नथनीयां बाली रे दैया
आजु मनले गई झांके झरोखे चंचल चपल चपलासी चमके
नैनां मिलाई गई रे दैयां—झुलनीयां०


Sangit Ratna

Prof. Amirkhan (Indore)

संगीत रत्न,

प्रो. अमीरखान (इन्दोर)

शास्त्रीय संगीत म्हटलें कीं कोणाच्याही डोळ्यांपुढें प्रोफेसर अमीर



खांसाहेब यांचें नांव उभें राहतें! त्यांच्या संगीत प्रवीणतेबद्दल त्यांस संगीत शिरोमणी' संगीत रत्नाकर, संगीत सुधाकर, 'संगीत रत्न' अशा इतक्या गौरवपद व पदव्या मिळाल्या आहेत कीं त्यांचा अशा पदव्यांनीं गौरव करण्याबद्दल हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांमध्यें रसिकांची एकमेकांशीं स्पर्धाच चालू आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. संगीतकलेमध्यें स्वर्गीय आनंद प्राप्त करून देणारें जें सामर्थ्य भर-

लेलें आहे त्याची शंभर टक्के कल्पना यायला अमीर खांसाहेबांचेंच गायन ऐकण्याची संधी मिळाली पाहिजे त्यांनीं या रेकार्डमध्यें श्याम कल्याण रागाचें संपूर्ण स्वरूप गाऊन दाखवलें असून एका बाजूस अस्ताई व दुसऱ्या बाजूस जलद फीरत दाखविली आहे. एकंदरींत खांसाहेबाच्या या रेकार्डस म्हणजे संगीताची मेजवानीं च आहे असें म्हणावयाला हरकत नाहीं.

VE 1002 { आज सो बना भाग १ ला (श्याम कल्याण)
१००२ { आज सो बना भाग २ रा. (,, ,,)

आज सो बना बन आयोरी । लाड लडावन दे ।
बनरे के शीर सहेरा मोतिया बिराजे । बनरी के मन बिहावे ।

Miss Radharani. मिस राधाराणी.

नर्तनाच्या रेकार्डस तुम्ही कितीतरी ऐकल्या असतील, पण राधाराणीच्या या रेकार्डसमध्यें और मजा भरलेली आहे ! त्यांच्या या नर्तनामध्यें अशा प्रकारची नाविन्य युक्त ढब तुम्हाला आढळून येईल कीं, त्यांतील खुमारी कायमचीच तुमच्या कानांशीं झंकार करीत राहील !

GE 2183 { न्यारी छब तोरी प्यारी प्यारी ... (नाच)
जी.ई. २१८३ { बहुत कठीन डगर पनघटकी ... (नाच)

Mritunjay Banerji मृत्युन्जय बेनरजी

श्रीयुत मुकर्जी यांचें नांव भजन स्पेशालिस्ट म्हणून इतकें सर्वश्रुत आहे कीं, त्यांच्याविषयीं अधिक माहिती करून देण्याचें कारण नाहीं. त्यांचें भजन ऐकलें कीं चित्तवृत्ती पाझरल्याशिवाय राहात नाहींत. त्यांच्या आतांपर्यंतच्या रेकॉर्डस फार लोकप्रिय झालेल्या असल्या तरी

या आम्हीं घेतलेल्या नवीन रेकॉर्डस त्याहूनही सरस असून, त्या अगदीं नवीन सुरावटीवर गाऊन दाखविण्याचें त्यांनीं इतकें अप्रतिम कौशल्य प्रगट केलें आहे कीं तें ऐकून कोणाही रसिकाच्या तोंडून त्यांच्या या कलेबद्दल धन्यतेचे उद्गार निघाल्यावांचून राहणार नाहीं.

GE 2185 जी.इ. २१८५	मुखडा क्या देखे दरपनमें	... (भजन)
	खबर नहि या जगमें	... (,,)

URDU RECORDS — उर्दु रेकॉर्डस्

Kadolikar & Party. — कडोलीकर एन्ड पार्टी.



विनोदाला संगीताची जाड दिली कीं त्याला बहारीचा रंग चढतो वशांत तो विनोद कडोलीकर पार्टीनें या रेकार्डसमध्यें दिलेल्या पद्धतीचा,

लगेच चटकन लक्षांत येण्यासारखा व आपल्या नेहमींच्या परिचयाच्या प्रसंगामध्यें खेळवलेला असला तर विचारूंच नका! या रेकॉर्डच्या एका बाजूला पोट दुखेपर्यंत हंसवणारा विनोदी भाग असून दुसऱ्या बाजूस एका रिकाम्या हकिमाच्या युक्त्या प्रयुक्त्यांनीं विनोदाचे फवारे उठवले आहेत. हें रेकॉर्डस म्हणजे हास्य- रसाची मजवानीच आहे. इतकेंही असून लहान मुलांसही समजेल इतक्या सोप्या पद्धतीनें त्याची मांडणी केली आहे.

GE 1716	झक्की तबलीया	(कॉमीक)
१७६१	डॉकटर जटल्ली	(,,)

एक बाजुः—

झंडेखांः—अमां बुंदेखां!

बुंदेखांः—कहो भई झंडेखां!

झंडेखाः—भई! कल छोटे खां साहबने अयसा गायाके वल्लाह मजा ही आया. वो सुरोंकी सजावट तालोंकी लगावट—अहा हा हा! भैया क्या कहूं—सारी महेफिल दंग हो गई.

बुंदेखांः—अमां महेफिल दंग हो गई या बेरंग हो गई. उडान पुडान के ठेका तालसे अयसा मालूम होता था के रुस जापानमें दोबारा जंग हो गई.

झंडेखांः—भैय्या मजाक नहीं जब खां साहेबने (बंधनवा बांधोरे) मीठे सुरोंमें गाया-तो मैयने मी धांधीं धागे तीरकीट तीन्नाने तीरकीट धींधी धागे तीरकीट काजो ठेका लगाया-तो भई कमाल हैंय कमाल हैंय कमाल हैंय.

बुंदेखांः—अमां कहांका कमाल-कयसा खियाल-येतो वही मसल हुई अम्मा भटयारन बावा भडभूंजेके आल और बेटे निकले शाह कमाल.

झंडेखां—बुंदेखां क्या बक्ते हो

बुंदेखांः—येही बकता हुं-के छोटेखां ने स्मशान गाया, तो तुमने कब्रस्तान बजाया,-न तालका ठिकाना, न सुरका पता,-कमनशीब. रागरागनियां अयसे अताईय्योंके हाथमें पडे,-तो उन्हें कब्र मिले न चिता.

झंडेखां—अमां चुप रहो! नहीं तो वो टप्पेकी थाप लगाउंगा के तुम्हें तिलवाडा बना दूंगा.

बुंदेखां:—मँय वो खियाल के ठेकाकी थाप लगाउंगा के तुम्हें आडा चौताला बना दूंगा.

झंडेखां:—मँय अदालतमें नालिश करने जाता हूं.

बुंदेखां:—मँयभी सरकारके रुबरु बेतालोंकी नालिश करने आता हूं

झंडेखां:—सरकार मेरी सुन्ये (झुमरा तालके बोल सुनाना) झुमरा तालमें तीरकीट आना चाहिय्ये.

बुंदेखा:—नहीं हझुर (झुमरे तालके बोल सुनाना) तीरक बजाना चाहिय्ये.

मेजिस्ट्रेट:—तुम दोनों पागल हो. अदालतका फुझुल वकत गंवाते हो.

बुंदेखां:—(झुमरा तालके बोल सुनाकर) सरकार झुमरा तालमें तीरक बोल आना चाहिय्ये.

झंडेखां:—(बोल सुनाकर) नहीं बडे हजूर झुमरा तालमें तीरकीट बोल सुनाना चाहिय्ये.

मॅजिस्ट्रेट:—जाव; तुम्हे सो सो रुपया जुरमाना. जुरमाना अदा न करो तो तुम्हारा ठिकाना पागलखाना.


झंडेखां:—अरे बाप!

बुंदेखां:—झुमरा तालकी उलटी थाप!

ताल अपना छोडकर दुन्यामें बेताले बने;
खानसे अब खानगी चींजोंके रखवाले बने;
वों घडी उलटी: चली के पुरे बारा बज गये
वाँ किस्मत आज हम बहेनोइथे साले बने;
तबलियोंकी म्हेफिलमें जानेके काबिल
रहे हम न अब मुं दिखानेके काबिल
तीरीक और तीरकीट ने वो थाप मारी
रहें अब न झुमरा बजाने के काबिल
जो कुछ करी कमाई अदालतमें खाई
बने अब हजामत बनाने के काबिल

दुसरी बाजुः—

डॉक्टर जटल्ली



डॉक्टरः—कम्पाउंडर !

कम्पाउन्डरः—यस सर !

डॉक्टरः—लोकल न अर्जंट–आपनी डिस्पेन्सरीमें Yes(यस) के बदले No(नो)पेशन्ट ?

कम्पाउन्डरः— वेल डॉक्टर ! पेशन्ट नहीं तो नहीं. मख्खियां तो भिनभिनाती हँय, बिमारोंके वदले खटमल, मच्छर, पिस्सूकी पलटन, आपका मेडिशन पिने आजाते हँय.

डॉक्टरः— कम्पाउन्डर ! अगर पेशन्ट नहीं आयेंगे तो हम अपनी डिस्पेन्सरीका खर्च कहां से लायेंगे ?

कम्पाउन्डरः— मारवाडीकी दुकानसे–नहीं तो किसी व्याज खोरे पठानसे.

डॉक्टर;— कम्पाउन्डर ! अब कोई पेटन्ट मेडिशन निकालना चाहिये. पब्लिसिटी करना चाहिये. तमाम पेपरोंमें ॲडवर्टाईझ देना चाहिये.

कम्पाउन्डरः— पेटन्ट मेडिशन ! कौनसा निकालना चाहते हैं !

डॉक्टरः— पलंग तोड गोलियां–कमर जोड पिल्स–अगर कोई जवान खाये खच्चर हो जाये–बुढा खाये चार गद्धोंकी ताकतवाला कहेलाये.

कम्पाउन्डरः— डॉक्टर ! आपने डिस्पेन्सरी चलानेको हिला तो खूब निकाला मगर एड्रेस भी कुच्छ हो निराला.

डॉक्टर— यस. अपना नंबर झीरो बोय झीरो— गप्पीदास गली— डीस्पेन्सरी ऑफ डॉक्टर जटल्ली.

मारवाडी —अरे मरी गियो–दातरशाब मरी गियो.

कम्पाउन्डर— शेठजी ! क्यौं चिल्लाते हँय–पुकारते हँय डॉक्टर साहेब राजबाई टॉवरकी तरेह तुम्हारे सामने खडे हँय. अभीसे इन बेचारों को क्यों मारते हैं.

मारवाडी—दातरशाब म्हारे पेटना पेटमां दखेशे

डॉक्टर—न घबराव सेठजी बैठ जाव–अच्छा कल रात तुमनें क्या खाया था ?

मारवाडी—कुश नै दातरशाब. एक शपाती–पन जराशी जल्ली हुई थी.

डॉक्टर--क्या जल्ली हुई चपाती-खाई ?

मारवाडी--हां शाब-पैशो खरच खाते लीखी गयो फिर शपातीको फेंकणा कयशा ?

डॉक्टर--कंम्पाउन्डर !

कम्पाउन्डर—यस डॉक्टर !

डॉक्टर—अपना नैनसुख काजल सेठजीकी आंखोंमें डालो !

मारवाडी—पन दातरशाब ! म्हारे तो पेट दु:खेशे-आंखमां काजल की कारन नाखो हों.

डोकटर—सेठजि तुम्हारी आंखें खराब हो गइ हैं-पहेंले आंखोका इलाज करना चाहिये बादमें पेट देखा जायेगा.

मारवाडी—अरे दातरशाब ! म्हारी आंखों तो शाबुद हैं.

डॉक्टर--अगर तुम्हारी आंखें अच्छी होतीं तो तुम जली हुई चपाती कभी नहीं खाते.

कम्पाउन्डर-- (काजल लाकर) शेठजी आंखें खोलो काजल पहेनलो.

मारवाडी—अरे दातर थारो नखोद गियो-म्हारी आंखों फोरी नांखी-शपाही दौडो शपाही- दातर शबे म्हारी नांख्यो.

डाकटर—कम्पाऊन्डर, शेठजोसे जल्द अपनी फीस वसूल करो नहीं तो भाग जाएगा,

कम्पांउन्डर:—डॉक्टर, अपना बोरया बंधना जल्द उठाइये नहीं तो सेठजी हमें बडा घर दिखाएंगें.

डॉक्टर:—फूटी हमारी किस्मत भागो खाली मयदान। हैं


कम्दाउन्डर:—ये मांरवाडी बच्चा अपने लिये शयतान हैं.
मारवाडी:—ओ शपाईयों दोडो

पोलिस जो आकर धमके तो जेलमें मकान हय.
अररर फोडी नाखी ऑख्यों मोको बाप.

डॉक्टर:— फिसका पहेले इन्जक्शन दे छूटे फिर ये पाप.
कम्पाउन्डर—डिस्पेन्सरीके मेडीशनको सूंघे काला सांप.
मारवाडी—अररर फोडी नांखी ऑख्यों मारो बाप.

Master Mohan (Junior) मास्तर मोहन (ज्युनीअर)

सोप्या संगीताचा कुशलतेनें उपयोग करुन मानवी आयुष्याच्या विविध



बाजू किती उठावदार रीतीनें दाखवतां येतात व इष्ट तो रस कसा अचूक निर्माण करतां येतो, या गोष्टीचा प्रत्यय या रेकॉडस् पाहून कोणालाही थईल. या रेकॉर्डमध्यें एका बाजूस दारुड्याची अन्नान्नदशा व दुसऱ्या बाजूस गांजेकसूच्या स्थितीचें दृश्य सुंदर आवाजांत गाऊन दाखवलें आहे. अशाप्रकारचें रेकॉर्डस् लोकशिक्षणाच्या दृष्टीनें किती परिणामकारक होऊं शकतात, याची यांवरून नीट कल्पना येईल. यांतील करुणरसानें तर तुमच्या चित्तवृत्ती विरघळून जातील.

GE. 1762 १७६२	{	बुरा हो चीलमका. हो गये मतवलीये	(गझल) (,,)

एक बाजु—

इन्सांथें हवा बने हैवानीयतने घर लीया
घांस जो चरना था इस दुनियामें आके चरलीया
अये चीलम बर दार तेरी आप बनी क्या कहुं
बोतलसे छुटी जान तो गांजेने बसमें कर लीया.
करामत चीलमकी चीलम शाह बनकर
गंजेडीके टोलेमें आसन जमाया.
बुरा हो चीलम का जो एक दम लगाया.
जवानिका गांजेने सरफा उडा दीया.
झरा मेरी किसमतकी खूबीतो देखो
हुवा जबके मुफलिस गंजेडी बनाया
मुजे देख तेरी लुगाइने बोला
चुकन्दरसा मुले के क्यु घरमें आया.

दुसरी बाजू:—

हो गए मतवलीया अब दारुके पीनेसे
कपडे फट गए टुक्डे उड गए हो गए रद जीनेसे—हो गए
हुवे मुफलीस सुनेरी बोतलोकी आशनाइमें
क्या करतें हैं सब रोझ इसी मदकी जुदाईमें—हो गए
कमातें हैं गद्धेकी तराह दिनभर कारखानें में.
उडादेतें हैं जाकर रातको कलाल खानें में—हो गए

न कपडें हैं न जुतें हैं न लोटा हैं न थाली हैं
गृहस्तीमें फक्त दो बोतलें और एके प्याली हैं—हो गए
सभी हस्तें हुवे मिलते हैं जब तक चार पैसे हैं
न पुंछेगा कोई मुफ़लीसीमें जी आप कैसे हैं—हो गए

GE. 1515	,, १५१५	उर्फे सोझे इशकने जीतना जी चाहे सताले	(गझल) (,,)
GE. 1543	,, १५४३	तेगे निग हे यार श्य म तोहे बंम्ब मे	(,,) (पहाडी)
GE 1558	,, १५५८	आविश कही गया छो अजब मनोहर	(गझल) (,,)
GE. 1582	,, १५८२	उफ त मे बराबर है नहि वा अब्दील	(,,) (,,)
GE. 1600	,, १६००	खीयाल ही में मझे सांये जोस रात को हम	(,,) (,,)
G.E.1622	,, १६२२	चली जा चली जा किनारे हमने उसकी एक अदापर	(कवाली) (गझल)
G.E.1698	,, १६९८	अदा मार डालेगी लाखन हम तेरे होए	(गझल) (,,)
G.E.1732	,, १७३२	मेरा जुदा मीझाज है हम आज मीटके नीकालेंगें	(,,) (,,)
G.E.1747	,, १७४७	इधर आओ मेरी वहेसत्का तेने मरझमें दमका सुमार	(,,) (,,)

Inayet Husein (Palanpur) **इनायत हुसेन.** (पालनपुर)

पालनपुर येथील सुप्रसिद्ध गवई इनायत हुसेन इतके लोकप्रिय झाल्या आहेत कीं त्यांच्या नवीन रेकॉर्डसची रसिक उत्कंठेनें वाट पाहात असताल. इतर कुठल्याही गवया च्या आवाजांत न आढवणारी अशी एक और गोडी इनायत हुसेन यांच्या गायनांत आढळून येते विशेषतः त्यांच्या पहाडी आवाजांतील न.त्, गझल कवाली म्हणजे तर आनंदाची लय-लूटच ! या त्यांच्या नवीन रेकॉर्डस याच नात् गझल कवाली मध्यें असल्या-मुळे त्या ऐकून रसिक खूष होतील या बद्दल आम्हाला पूर्ण खात्री आहे.



GE 1763 } जमाले मूबारक (नात कव्वाली)
१७६३ } एक तुमने नुरसे (नात गझल)

एक बाजू—

जमाले मुबारीक दीखा कमलीवाले, हो हासील. मेरा मुदुआ कमलीवाले
मेरा दिलमें नकश जमा कमलीवाले, मुझे अपना शयदा बना कमलीवाले
नसीब होवे फीरदोस सदके में तेरे, मुझे जामे कशर पीला कमलीवाले
बहु मस्त सरशार साकी यै कौसर, शराबे महोबत्त पीला कमलीवाले
जियारत का इसलल को है तस्सउर, कभी ख्वाबमें मेरे आ कमलीवाले

दुसरी बाजु:—

एक तुमनें नुरसे मासुर जलवा कर दीया
अय खुदा आलमको फीर म्हवे तमाशा कर दीया

जोश में आने लगे कतरे को दरीया कर दीया
जिसपें पड गइ हँय नझर बंदोको मौला कर दीया
आग लेने को गये थे बख्स दी पयगंबरी
तुरपे बुलवा के तुने अैसा रुत्तबा कर दीया
खुद उन्हे मंझुरथा अपना तमासा देखना
खाक्का पुत्तला बना कर नूर पयदा कर दीया

Prof. Mahamedkhan Shamshi
(Hyderabad)

प्रो. महमदखां शमशी
(हैदराबाद)



आपली गायनकला रेकॉर्डसच्या द्वारें रसिकांपुढें न मांडण्याच्या तत्त्वाला जे नामांकित गवई चिकटून राहिलेले आहेत, त्यांतील एका बड्या कलावानाला रेकार्डस द्यावयाला प्रवृत्त करण्याचें श्रेय आम्हांला मिळाल्याबद्दल आम्हांला अभिमान वाटतो. आमच्या नवीन रेकॉर्डिंग मशीनची चोख काम देण्याबद्दलची ख्याती ऐकून शमसी-साहेबांनीं आपले रेकॉर्ड पहिल्यानेंच आमच्या कंपनीमध्यें घेऊं दिलें व त्यामुळेंच गझल गाण्यांची त्यांची और गोडी आमच्या चहात्यांनां प्रत्यक्ष दाखवण्याची आम्हांला संधी मिळाली आहे.

GE 1754 } उस संगे आसतांपे (गझल)
१७६४ } सना बशरके लिये (,, दुर्गा)

एक बाजुः—

उस संगे आसतांपे जबीने न्याझ हैं.
बलाह कया नमाझ हमारी नमाझ हैं.
हर आयने के परदमें आयना साझ हैं.
हर नंदके लिबासमें बंदा नमाझ हैं.
झाहिद को अपने झोद ईबादतपे हैं गुरुर
मुजको तेरी करम तेरी नाझ रहमतपे हैं.
अय हम नशीग वों कोन च्येए इश्के मीझाज हैं
महमूद जीस गर्लीमें गुलामें अयाज हैं

दुसरी बाजुः—

सना बशरके लीये हय बशर सना के लीये
तमाम हम दस सजाबार हैं खुदाके लीये
आता के सामने यारब खत्ताका झक्रही क्या.
के तु अता के लीये ह बशर खताके लीये
तेरे करमने वहीं आके दश्त गीरीकी
के बे खताभी तरसने लगे खताके लीये
वाँरंग लाई हैं रहमत तेरी सरे माशर
गुनाहगारो के जब हाथ उठे दुआके लीये.

Miss Sindhubala — मिस सीन्धुबाला

मिस् सिंधुबाला यांच्या सुरेल कंठांतून निघालेले हे दोन सुंदर गझल कानीं पडतांच जणूं बुलबुल पक्ष्याचाच आवाज कानीं पडत असल्याचा तुम्हांला भाप होइल ! त्यांच्या सुरेल आवाजीच्या जोडीला योग्य साथ व मनपसंत तरजा हीं असल्यामुळें दुधांत साखर पडली आहे !

GE 2187 / २१८७ { या इलाही कीसी पहलुसे (गझल)
जान दो दीनकी हँय महमान (,,)

Miss Kamaladevi. — मीस कमळादेवी.

पंजाब येथील कमलदेवी यांचा पहिला वहिला रेकॉर्ड ऐकून जनता आम्हांला दोष एवढ्याबद्दल देईल कीं, इतक्या कुशल गायिकेचें रेकॉर्डस् यापूर्वींच आम्हीं घेतले नाहींत ! हिंदुस्थानांतील पहिल्या दर्जाच्या गायक गायिकांमध्यें या आपल्या पहिल्याच रेकॉर्डनें मिस कमलदेवीनें स्थान मिळविलें आहे.

GE 1337 / १३३७ { मै किसी तौरसे किंया शींकवाये बेदादकरु (गझल)
कीसको कहदु कान उसकी बचममें जी हौरा था ,,

GUJARATI RECORDS. — गुजराती रेकॉर्डस्

Ranchhod (Chapla) & Ragavji — रणछोड (चपळा) एन्ड राघवजी

GE 1765 / १७६५ { गडुलाल अनें ठुमरी (कोमिक)
मोंघीना मनोरथ (कोमिक)

Master Shamalji — मास्तर शामळजी

GE 1766 { अभिमन्युनी राखडी भाग १ लो
१७६६ { " " भाग २ रो.

Master Dinanath (Surat) — मास्तर दिनानाथ (सुरत)

GE 1767 { जोडी नथी जगमांय (गझल)
१७६७ { फुलनी फुलमाळा जेवी (")

Miss Hemlata Mehta, B.A. — मीस हेमलता मेहता, बी.ए.

GE. 1768 { मेहुलो गाजेने माधव नाचे (गरबो)
१७६८ { क्यां जाउरे वेरण रातमळी (कालींगडो)

SINDHI RECORDS — सीन्धी रेकार्डस्


Prof. Gulam Haider Rababi. — प्रो. गुलाम हैदर रबाबी.

GE. 1769 { महम्मद असांजो नबी (कवाली)
१७६९ { सोहनी सुरतवारा (")

INSTRUMENTAL RECORDS वाद्यांचें रेकार्डस्

Mohomed Yasin महमद यासीन.

मिरत येथील सुप्रसिद्ध तबलावादनपटु महमद यासीनखां यांनीं



अनेक मजलसींत चढाओढीमध्यें पहिला नंबर पटकावला असून आजपर्यंत कोणीही बाहेर न काढलेली अशी त्यांच्या तबलावादनाची सुंदर रेकॉर्ड प्रसिद्ध करण्याची संधी आम्हांलाच मिळाली आहे. तबल्याची खरी कला या रेकॉर्डमुळें रसिकांच्या ध्यानांत येईल व खांसाहेंच्या या जलद कलेबद्दल कोणाच्य ही तोंडांतून शाबासकीचे उद्गार निघतील. तबला या वाद्याची खरी शक्ति प्रथमच रेकॉर्ड ऐकून श्रोत्यांना पटेल, अशी अजब कला यामध्यें उतरली आहे !

GE. 1770 {	तबला	(गत)
१७७०	,,	(,,)

Mohan & Party — मोहन एन्ड पार्टी

हार्मोनियम हें वाद्य आधींच सोयीस्कर ! त्यांत मास्टर मोहन सारख्या कलावंतानें त्यांतून काढलेले सूर इतके अपूर्ण प्रकारचे आहेत कीं ते ऐकून कोणीही नागाप्रमाणें डोलूं लागेल. या रेकॉर्डमध्यें मुरलीचा नाच उतरवण्यांत आला आहे. हार्मोनियम मधून निघालेले हे मुरलीचे सूर म्हणजे एक अजब कला आहे. हे ऐकून कोणीही तोंडांत बोट घालील ! हार्मोनियमवर ते निघत आहेत ही गोष्टच आधीं ऐकणाऱ्याला खोटी वाटेल, इतकी हुबेहुब मुरलीची मोडी त्यांत उतरली आहे.

GE. 1771	हारमोन्यम	(मुरली)
१७७१	,,	(भैरवी मिश्र)

MARWARI RECORDS — मारवाडी रेकार्डस

Master Mohan (Junior) — मास्तर मोहन जुनिअर.

GE. 1772	मयँतो मरीरे	(मांड)
१७७२	बीछु डेरी मारी पीहर चालीं	(मांड)

EAST INDIAN RECORDS ईस्ट ईन्डिअन रेकॉर्डस्

F. P. Gonsalves — एफ पी. गोनसालवीस

G.E 1754	नाताळचे सन गाजु
,, १७५४	मीठाईचे हाल हवाल



चोणकरांचीं माधुर्यपूर्ण आवाज व नादबद्धतेनें भरलेलीं दोनच गाणीं

GE 1627 } लपला गिरधर कोठ (पहाडी)
,, १६२७ } उमलल्या भावना (भैरवी)



सडोलीकरांच्या गायनांतील सुरेलपणा, स्वच्छ, दाणेदार व ललकारीच्या तानांची लज्जत ऐका

GE 1576 } दिल दिलरुबा (दुर्गा)
,, १५७६ } हो मद माते या डोळे (खंबावती)

GE 1666 } आवत घर (तिलक कामोद)
,, १६६६ } या श्रृंगार लहरी (तिलंग)



सिनेमास्टार 'स्वरकिन्नरी' कु. पद्मावती शाळिग्राम यांच्या खालील रेकार्ड शिवाय संगीताची पूर्णता होतच नाहीं अवश्य संग्रहीं ठेवा.

GE 1701 } भज कृष्ण कन्हैया (भजन)
,, १७०१ } तीरथको सब फिरे (तिलक कमोद)

GE 1727 } भज ले तूं राम मना (पहाडी मिश्र)
,, १७२७ } कानन करत मोसे रार (गांधार)